# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## दिनांक १६/०७/२०२४ (मंगळवार) सकाळ

### अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
### वाहनासह एकुण ६,०३४००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त

दि. १५/०७/२०२४ रोजी पोस्टे खापा येथील स्टाफ पो.स्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असता मौजा दुधबर्डी (गडेगाव शिवार) येथे एक लाल रंगाचा ५७५ डी १ सरपंच महिन्द्रा कंपनीचा ट्रॅक्टर क्र. एम एच— ४०/बी इ— २१६५ व बिना नंबरची लाल रंगाची ट्रॉली चा चालक **आरोपी नामे— ईश्वर सेवकराम धुर्वे, वय २८ रा. रंगारीपुरा खापा** हा आपल्या ताब्यातील ट्राली मध्ये एक ब्रास रेती वाहतूक करतांना दिसून आल्याने चालक हा पोलीसांना पाहून आपल्या ताब्यातील वाहन सोडून घटना स्थळावरून पळुन गेला. सदर घटनास्थळाहुन एक लाल रंगाचा ५७५ डी १ सरपंच महिन्द्रा कंपनीचा ट्रॅक्टर क्र. एम एच—४०/बी इ— २१६५ व त्याला लागुन असलेले बिना नंबरची लाल रंगाची ट्रॉली किंमती ६,००,०००/— रू व ट्राली मध्ये एक ब्रास रेती किंमती ३०००/— रू तसेच दोन फावडे व दोन घमेले किंमती ४००/— रू असा एकुण ६,०३४००/— रू चा मुद्देमाल जप्त करून चालक **आरोपी नामे—१) ईश्वर सेवकराम धुर्वे, वय २८ वर्ष, रा. रंगारीपुरा खापा, मालक नामे— २) जगदीश पंढरी भुजाडे, वय ५१ वर्ष, रा. किल्लापुरा खापा** यांचा शोध खापा पोलीसांनी घेतला असुन त्यांना अटक करण्यात आली आहे. आरोपीतांविरुद्ध पोस्टे खापा येथे कलम ३०३(२) भारतीय न्याय संहीता सहकलम ४८(७), (८) म. ज. म. अधि. सहकलम ४, २१ खान खनिज अधि. १९५७, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतीबंधक अधि. १९८४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयात कलम ३(५) भा. न्या. सं. प्रमाणे कलमवाढ करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे खापा येथील ठाणेदार सपोनि. सुनिल दहीभाते, पोहवा खोमेश्वर बांबल यांनी पार पाडली. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा नरेश गाते हे करीत आहे.






## अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद
## पोलीस स्टेशन मौदा ची कार्यवाही

दिनांक १५/०७/२०२४ रोजी पोलीस स्टेशन मौदा येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरव्दारे खबर मिळाली की, मौदा येथे नागपूर रोड महादुला फाटा येथे अवैधरीत्या विनापरवाना रेतीची ट्रकव्दारे चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून पोलीस स्टेशन मौदा येथील स्टाफ याने नमुद घटनास्थळी जावुन टाटा कंपनीचा १० चक्का ट्रक क्र. MH-36/AA-0944 च्या चालकाला थांबवून तपासले असता सदर वाहनात ट्रक चालक व **आरोपी नामे– १) पवन उमरावजी रहागडाले, वय २७ वर्ष** व **वाहक नामे– २) आकाश श्रीराम बांगडे वय २४ वर्ष दोन्ही रा. गर्रा बघेडा तूमसर** हे ट्रकमध्ये अवैधरीत्या रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने त्याच्या ताब्यातून १० चक्का ट्रक क्र. MH-36/AA-0944 किंमती अंदाजे २०,००,०००/– रू. व ०४ ब्रास रेती किंमती अंदाजे २०,०००/– रू. असा एकुण २०,२०,०००/– रूपयाचा मुद्देमाल आरोपींच्या ताब्यातुन जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे **चालक १) पवन उमरावजी रहांगडाले वय २७ वर्ष २) आकाश श्रीराम बांगडे वय २४ वर्ष दोन्ही रा. गर्रा बघेडा तूमसर ३) फरार आशिष सहादेव पटले रा. डोगरला तूमसर** यांचेविरुध्द कलम ३०३ (२), ४९ भा. न्या. सहिता ४८(७), ४८(८), म. ज. म. स ४, २१ खाण. खनिज ३ सा. सं. नुकसान प्र. अधि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा.), मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा) यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे मौदा येथील ठाणेदार सतिशसिंग राजपूत, पोशि अतुल निंबार्ते यांनी केली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर